PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>**

# पार्ले महोत्सवातून अनेक चित्रकार,कलावंत घडतील- विकास सबनीस

मुंबई दि.२५ :पार्ले महोत्सव सारखे उपक्रम होत राहण्याची गरज असून त्यातून अनेक चित्रकार, कलावंत घडतील असा विश्वास जेष्ठ व्यंगचित्रकार विकास सबनीस यांनी व्यक्त केला. महोत्सवामधील चित्रकला, व्यंगचित्र, रांगोळी अशा विविध कला विभागातील स्पर्धांच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. स्पर्धेच्या निमित्ताने मुलांमध्ये कलेविषयी आवड निर्माण होते तसेच त्यांना शिकायलाही मिळत असल्यामुळे त्यांच्यातील कलावंत घडत असतो असेही ते म्हणाले.

पार्लेमहोत्सवामधील चित्रकला, व्यंगचित्र, रांगोळी मधील स्पर्धकांनी यावेळी महिलांवरील हल्ले या ज्वलंत समस्येबाबत आपल्या कलाकृतीतून वाचा फोडली. तसेच अनेक स्पर्धकांनी स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विविध चित्रातून त्यांना श्रध्दांजली वाहिली. आपल्या कलाकृतीतून सामाजिक विषयांवर जनजागृती करण्याची आपली परंपरा असुन त्याचा योग्य उपयोग होण्यास पार्ले महोत्सवाचे हे व्यासपीठ उपलब्ध केल्याबद्दल उद्योगपती व सामाजीक कार्यकर्ते श्री.योगेंद्र राजपुरीया यांनी आयोजक अॅड.पराग अळवणी यांचेही कौतुक केले.

पार्ले महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी क्रिडा स्पर्धांनाही प्रचंड प्रतिसाद देत टेबल टेनिस, खो-खो, योगा, वॉलीबॉल, कबड्डी, क्रिकेट या स्पर्धांमध्ये खेळाडू तसेच क्रिडारसीक प्रेक्षकांनी गर्दी केली. योगाच्या वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धेमध्ये ५ वर्षे ते ६० वर्षापर्यंतच्या सुमारे २५० स्पर्धकांनी भाग घेतला. तर प्रथमच होणाऱ्या टेबल टेनिस स्पर्धेतही याच वयोगटातील सुमारे ३०० स्पर्धकांनी भाग घेतला. यावर्षी सहभागाचा उच्चांक वाढत २१५ संघ कबड्डी, १५० संघ वॉलीबॉल, २०० संघ क्रिकेट, ७६ संघ खो-खोमध्ये तर ९६ संघ फुटबॉलध्ये सहभागी झाले. पार्ले महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी ५००० स्पर्धकांनी हजेरी लावली तर सुमारे २०० बक्षिसे बहाल करण्यात आली. स्वामी विवेकानंद यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधत सर्व विजयी स्पर्धकांना रोख रक्कम, ट्रॉफीसह स्वामी विवेकानंदावरील पुस्तकेही देण्यात आली, अशी माहिती पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक अॅड. पराग अळवणी यांनी दिली. या प्रसंगी श्री. विकास सबनीस, श्री.निलेश बागवे, नगरसेविका सौ.ज्योती अळवणी, श्री.विजय आम्रे, श्री. योगेश राजपुरीया, श्रीमती अंजली जीन्सीवाले आदी मान्यवर मंडळी प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते.

---

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.